Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849298

# भारतीय लोकशाही आणि सुशासन

डॉ. डोंगरे दिपक कोंडीराम[1]

**प्रस्तावना :-**

लोकशाही व सुशासन यांचा खूप जवळचा संबंध असून पारदर्शक आणि कार्यक्षम सुशासनाच्या माध्यमातून लोकशाहीचा विकास होतो 1990 च्या दशकामध्ये सुशासन या संकल्पनेचा उदय झालेला असून सुशासनाच्या संकल्पनेत नागरिक हा मध्यवर्ती आहे. तसेच लोकशाही शासन व्यवस्थेत नागरिक केंद्रीय प्रशासनामध्ये नागरिकांचा आवाज शासन प्रक्रियेत उमटला जाणे आवश्यक मानले जाते भारताचा राज्यकारभार स्वच्छ पारदर्शक लोकाभिमुख होण्यासाठी सुशासनाचे नेत्यांत गरज आहे संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेत कल्याणकारी राज्याचा हेतू साध्य करण्यासाठी सुशासनाचे आवश्यकता असते. लोकशाही म्हणजे असे शासन जिथे सत्ता लोकांच्या हातात असते. लोक थेट किंवा अप्रत्यक्षपणे शासनात सहभागी होतात. नागरिकांना समान हक्क व स्वातंत्र्य दिले जाते .

सुशासनाचा अर्थ:-लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये सुशासनाच्या माध्यमातून जनतेला पारदर्शकपणे सेवा प्रदान केल्या जाणे अपेक्षित असते. सुशासन म्हणजे चांगले शासन न्यायावर आधारित शासन म्हणजे सुशासन होय. चांगले शासन ही संकल्पना, तुलने आधुनिक आहे संयुक्त राष्ट्र संघ इनो आणि जागतिक बँक यासारख्या संस्थेने या संकल्पनेवर विशेष भर दिला आहे. सुशासन म्हणजे १) लोककेंद्रीत प्रशासन 2) निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता 3) भ्रष्टाचार मुक्त व्यवस्था 4) कायद्याचे पालन 5) प्रशासनाचे कार्यक्षमता,

**संशोधन समस्येचे विधान:-**

आजच्या काळात भ्रष्टाचार, राजकारणातील गुन्हेगारीकरण प्रशासकीय अपयश, सामाजिक विषमता आर्थिक असमानता व नागरिकांची उदासीनता या घटकामुळे भारतीय लोकशाही व सुशासन प्रभावीपणे कार्य करत आहे काय, हा मूलभूत प्रश्न निर्माण होतो हीच समस्या या संशोधनाचा केंद्रबिंदू आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:-

1. सुशासनाच्या संकल्पनेचे विश्लेषण करणे.

---

[1] राज्यशास्त्र विभाग, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई, ता. गेवराई,जिल्हा बीड.

2.भारतीय लोकशाही व सुशासना पुढील प्रमुख आव्हाने कोणती ते अभ्यासणे

संशोधन पद्धती: -

संशोधनासाठी वर्णनात्मक विश्लेषात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये पुस्तके शासकीय अहवाल संशोधन लेख वर्तमानपत्रे व विश्वसनीय संकेतस्थळाचा समावेश आहे.

**कीवर्ड्स** -भारतीय लोकशाही, सुशासन, पारदर्शकता, भ्रष्टाचार, सामाजिक व आर्थिक विषमता.

**भारतीय लोकशाही आणि सुशासना पुढील आव्हाने**

**१) राजकीय गुन्हेगारीकरण :-**

राजकीय गुन्हेगारीकरण म्हणजे गुन्हेगारी आरोप असलेल्या व्यक्तींचा राजकारणातील वाढता सहभाग या व्यतिरिक्त या शब्दाचा अर्थ गुन्हेगारी पार्श्वभूमीतून आलेले लोक आणि राजकारणी आणि निवडून आलेले प्रतिनिधी बनतात त्यामुळे राजकारणातील गुन्हेगारी चिंतेचा विषय बनत चाललेला असून लोकशाही व्यवस्थेत याचा धोका वाढत चाललेला आहे राजकारणाच्या गुन्हेगारी करण्याबद्दल सार्वत्रिक चिंता व्यक्त केली जात आहे. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत 233 विजयी उमेदवाराविरोधात गुन्हे दाखल होते यापैकी 159 म्हणजे लोकसभेतील तब्बल 29 टक्के खासदाराच्या विरोधात खून, बलात्कार चोरी दरोडे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अहमदाबाद या संस्थेने 1999 साली निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवणाऱ्या द असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिसर्च (ADR) या संस्थेची स्थापना केली होती.१ या संस्थेच्या सर्वेच्या अहवालानुसार 2004 पासून भारतात संसदेत निवडून आलेल्या गुन्हेगारी आरोप असलेल्या उमेदवारांची संख्या वाढत आहे 2004 मध्ये 24% संस्था सदस्यावर फौजदारी खटले प्रलंबित होते ते 2019 मध्ये वाढून 43 टक्के झाले आहे

**2) सामाजिक आर्थिक विषमता आणि सुशासन :-**

सामाजिक आणि आर्थिक विषमता नष्ट झाली नाही तर ती त्या राजकीय लोकशाहीला गिळून टाकेल आज आर्थिक असमानता इतक्या टोकाला पोहोचले आहे की ती देश समाज आणि लोकशाहीसाठी गंभीर धोका ठरत आहे. भारताचे नाव जरी आज जगातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये घेतले जात असले तरी समंतच्या दृष्टीने पाहता समाजात आजही मोठी दरी स्पष्टपणे दिसून येत आहे. जागतिक असमानता

अहवाल 2026 नुसार भारतातील एकूण संपत्ती पैकी सुमारे 65 टक्के म्हणजेच जवळपास दोन तृतीयांश संपत्ती ही अवघ्या दहा टक्के श्रीमंतांच्या हातात केंद्रित आहे. 50% लोकांकडे केवल 6.4% संपत्ती आहे महिला कामगार सहभाग दर केवळ 15.7% इतकाच आहे देशातील अव्वल एक टक्के लोकांकडेच 40% हून अधिक संपत्ती एक वाटलेली आहे.2 भारतातील उत्पन्नातील असमंत याची प्रमुख कारणे म्हणजे शिक्षण व आरोग्य सुविधा पर्यंत असमान प्रवेश रोजगाराच्या संधी मधील तफावत कौशल्य व वेतनातील दरी प्रादेशिक असंतुलन जात व लिंगावर आधारित भेदभाव आणि संपत्तीचे केंद्रीकरण महागाई अप्रभावी संसाधना व आर्थिक संधीचे असमान वितरण यामुळे ही दरी अधिकच होत चालली आहे

**3.भ्रष्टाचार आणि सुशासन :-**

भ्रष्टाचार म्हणजे सत्तेच्या पदावर असलेल्यांचे अप्रमाणिक वर्तन त्यांची सुरुवात काही वैयक्तिक फायद्यासाठी सार्वजनिक पदाचा वापर करण्याच्या प्रवृत्ती पासून होते"३ जर एखाद्या देशातील लोक भ्रष्ट असतील आणि लोकसंख्या वेगाने वाढत असेल तर त्या देशाला चांगले प्रशासन असल्याचे मान्य जाऊ शकत नाही भ्रष्टाचार आर्थिक पाया नष्ट करतो, विकसनशील देशांना परकीय गुंतवणूक आकृती क्षित करण्याच्या क्षमतेत अडथळा आणतो संयुक्त राष्ट्रांनी सुशासन संकल्पनेची व्याख्या केली आहे त्यात त्यांनी पारदर्शकता व कायद्याचे राज्य हे सुशासनासाठी आवश्यक मुद्दे मांडले आहेत पारदर्शकता हा मुद्दा भ्रष्टाचाराशी संबंधित आहे . प्राणप्रन्सी इंटरनॅशनल भ्रष्टाचार धारणा निर्देशांक (cpI) 2023 मध्ये एकुण रेषाख दर्शवतो की गेल्या दशकात बहुतेक देशांमध्ये भ्रष्टाचारावरील नियंत्रण स्थिर आहे. की ते आणखी बिघडले आहे 2023 अनुसार भारताचा भ्रष्टाचाराचा धारणा निर्देशांक 40 अंकाने वाढत आहे त्यामुळे भारतात देखील मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होताना दिसत आहे

**निष्कर्ष:-**

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असून ती विविधता, धर्मनिरपेक्षता, संघराज्य व्यवस्था आणि संविधानिक मूल्यांवर आधारित आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही संस्थांचे बळकटीकरण, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, न्यायव्यवस्थेची स्वायत्तता आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण प्रगती साधली आहे. तथापि, लोकशाहीचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी आणि सुशासनाची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी अनेक आव्हाने आजही समोर उभी आहेत.

राजकीय भ्रष्टाचार, पैशाचा आणि सत्तेचा वाढता प्रभाव, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या उमेदवारांची निवडणूक प्रक्रियेत वाढती उपस्थिती ही लोकशाहीच्या गुणवत्तेला बाधा आणणारी प्रमुख समस्या आहे. तसेच, जातीय, धार्मिक

आणि प्रादेशिक ध्रुवीकरणामुळे सामाजिक एकात्मतेवर परिणाम होत असून लोकशाही मूल्यांना तडा जात आहे. डिजिटल युगात चुकीची माहिती (Fake News), सोशल मीडियाचा गैरवापर आणि माध्यमांवरील दबाव ही नवी आव्हाने निर्माण झाली आहेत.

**संदर्भसूची:**


1. कठाणे प्रशांतकुमार. (२०१८). लोकशाही निवडणूक आणि सुशासन. शिवाली पब्लिकेशन्स नागपूर.
2. बसू दुर्गा दास. (२०१५). भारतीय राज्यघटनेची ओळख. : Lexis Nexis गुरगाव
3. बोधनकर सुधीर, अलोणी चिवेक आणि कुळकर्णी मृणाल. (२०१४). सामाजिक संशोधन पध्दती. : श्री साईनाथ प्रकाशन. नागपूर
4. lokmat २०/०५/२०२३
5. साळुंखे सुहास. २०२२, फेब्रुवारी १६. राजकारणाच्या गुन्हेगारीवर सर्वोच्च आदेश. लातूर : दैनिक पुण्यनगरी.


**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*